**INTERNATIONAL INDIAN SCHOOL, DAMMAM**

**MIDDLE SECTION**

**TERM – II EXAM DECEMBER – (2017- 18)**

**CLASS – VIII** **SUBJECT: MARATHI** **DURATION: 3Hours**

**MARKS: ------/80**

---

**Instructions:**

1. **Read questions carefully and attempt all.**
2. **Recheck your paper thoroughly before submission.**

---

**प्र. १. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **[1x10=10]**

१) ----------- पिण्यामुळे माणूस अमर होतो. (विष/अमृत)

२) त्याच्या पायाखालची -------- सरकू लागली. (माती/वाळू)

३) माझ्या ------- सगळं काही मिळतं. (दुकानात/घरात)

४) आपण आमचे ------- आहात. (बंधू/पाहुणे)

५) दिनूच्या शाळेचा आज ------- दिवस होता. (पहिला/शेवटचा)

६) बॅगवाल्याला -------- मारायला सुरवात केली होती. (काठीने/लाथाबुक्क्यांनी)

७) दिनूला -------- करायचा छंद होता. (आकडेमोड/बेरीज)

८) ------- मी होणार नाही, झुंजता तुमच्या तुमच्या सवे. (निराश/उदास)

९) बॅगवाल्याच्या मागे ------- माणसे धावत होती. (सहा/चार)

१०) वेदना झाल्या तरीही ----- मी गाळणार नाही. (अश्रू/पाणी)

**प्र.२.] शब्दार्थ लिहा. (Any 5)** **[1x5=5]**

१) १. कर्पूर २. कट्यार ३ मुद्रा ४. हैराण ५. गुन्हेगार ६.वर्दळ

**प्र.३] समानार्थी शब्द लिहा: (Any 5)** **[1x5=5]**

१) आकांक्षा २. झुंज ३. मंदिर ४. कमाई ५. जल ६. नौका

**प्र.४] विरुद्धार्थी शब्द लिहा: (Any 5)** **[1x5=5]**

१) आनंद २)आशा ३) सुगंध ४) आवडीचा ५.अमृत ६. मरण

**प्र.५] लिंग बदला: (Any 4)** **[½ x 4= 2]**

१. लाडका २. चिमुरडा ३. मित्र ४. आई ५. मुलगा

**प्र.६] वचन बदला:** **[½ x 6= 3]**

१. कट्यार २. दिवे ३.विषय ४. शाळा ५. भांडी ६. वस्तू

**प्र.७] अचूक शब्द निवडून लिहा** **[½ x 4= 2]**

१ वीधाता, विधाता, विदाता २. माणुसकी, माणूसकी, माणुसकी

३ जगन्नथ, जगनाथ, जागन्नथ ४. तिरावरती, तीरावरति, तीरावरती

**प्र.८] वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा** **[1x3=3]**

१. हैराण होणे २. गायब होणे ३. व्यस्त असणे

**प्र.९] कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **[1x3=3]**

१. "पन्नास सुवर्ण मुद्रांची पैज लावणार का"?

२. "काय? तुमच्याकडे अमृत आहे?"

३. “अरे, तुला काही कामं नाहीत का?”

**प्र.१०] कवितेतील कडव्याच्या ओळी पूर्ण करा.** **[½ x 6= 3]**

बाई --------- झालं

---------- ---------- फाकल !

बांग ------------- दिली

------------ जाग आली !

धेनु ------------- गोठ्यात

पक्षी जगले घरट्यात !

**प्र.११] खालील वाक्यातील विशेषण ओळखा व लिहा.** **[½x4=2]**

१. मुंबई ला मोठा समुद्र आहे.
२. राहुल उंच मुलगा आहे.
३. आईने मला दोन पेन दिली.
४. माझ्या शाळेत खूप विद्यार्थी आहे.

**प्र.१२] खालील रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्यय वापरून लिहा.** **[½x4=2]**

१. मी घरी पोहचलो ----------- घड्याळात सहा वाजले होते.
२. तो इतका दमला होता, --------- त्याच्याने पुढे बोलवेना.
३. जर नियमित अभ्यास करशील ----------खात्रीने पास होशील.
४. मला मुंबई ची हवा आवडत नाही; ------------ तेथे फार उकडते.

**प्र.१३] विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या लावा.** **[½ x 6=3]**

| | | |
|---|---|---|
| १. गाफील | अ) दु:ख | ( ) |
| २. बिकट | आ) पुढे | ( ) |
| ३. आनंद | इ) निराशा | ( ) |
| ४. आशा | ई) जागरुक | ( ) |
| ५. मागे | उ) अमृत | ( ) |
| ६. विष | ऊ) सोपा | ( ) |

प्र.१४] **एका वाक्यात उत्तरे लिहा. (Any 8)** **[1x8=8]**

१. कवी संकटांना काय म्हणतो?
२. कवी संकटांना कोणते आव्हान करतो?
३. आव्हान कवितेच्या कवीचे नाव काय आहे?
४. दिनूला बक्षीस कोणी दिले?
५. दिनूचा आवडता विषय कोणता होता?
६. दिनूला कशाचा छंद होता?
७. रामोजी कोणत्या गावातून जात होता?
८. लोट्यात काय होते?
९. रामोजीच्या मनाला कोणती गोष्ट पटली नाही?

प्र.१५] **थोडक्यात उत्तरे लिहा. (Any 2)** **[3x2=6]**

१. कवी संकटांचे घाव कसे झेलतो?
२. दिनूच्या छंदाविषयी लिहा.
३. रामोजीच्या पायांखालची वाळू का सरकू लागली?

प्र.१६] **संदर्भासहीत स्पष्टीकरण करा.** **[1x3=3]**

१. आव्हान माझे तुम्हांला चालून या माझ्यावरी
धैर्याची कट्यार माझी पाजळेन तुमच्यावरी

प्र.१७] **खालील कविता वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[1x5=5]**

गडबड घाई जगात चाले,
आळस डुलक्या देतो; पण
गंभीरपणे घड्याळ बोले -
'आला क्षण-गेला क्षण !'
घड्याळास या घाई नाही,
विसावाही तो नाही; पण
त्याचे म्हणणे ध्यानी घेई-
'आला क्षण-गेला क्षण !'

कर्तव्या जे तत्पर त्यांचे
दृढ नियमित व्हावयास मन,
घड्याळ बोले अपुल्या वाचे-
'आला क्षण-गेला क्षण !'

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. गडबड घाई कोठे चालते आहे?

२. घड्याळ गंभीरपणे काय बोलते?

३. कोणाचे मन दृढ होते?

४. घड्याळ या काय नाही?

५. डुलक्या कोण घेतो?

**प्र.१८] उतारा वाचा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[1x5=5]**

## मुंबई

**मुंबई** ही भारतातल्या महाराष्ट्र राज्याची राजधानी असून भारतातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. मुंबईची लोकसंख्या सुमारे ३ कोटी २९ लाख आहे. हे शहर महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर वसले आहे. मुंबई हे भारतातील सर्वांत श्रीमंत शहर असून दक्षिण, पश्चिम आणि मध्य आशियातील सर्वांत जास्त वार्षिक सकल उत्पन्न असलेले शहर आहे. आपल्या उपनगरांसह मुंबई जगातील ५वे सर्वांत मोठे शहर आहे. मुंबई शहराला नैसर्गिक बंदर लाभले असून या बंदरातून सागरी मार्गाने होणारी भारताची ५०% मालवाहतूक होते.

मुंबई ही भारताची आर्थिक व मनोरंजनाची राजधानी आहे. रिझर्व बँक, मुंबई शेअर बाजार राष्ट्रीय शेअर बाजार या महत्त्वाच्या आर्थिक संस्था या शहरात आहेत. मुंबईत अनेक कंपन्यांची मुख्य कार्यालये आहेत. येथे व्यवसाय व नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध असल्याने देशाच्या इतर भागातून मोठ्या प्रमाणात लोक मुंबईत येतात. मुंबई हे बॉलीवूड व मराठी उद्योगाचे केंद्र आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे मुंबईच्या हद्दीतच आहे.

प्रश्न:

१. मुंबई ची लोकसंख्या किती आहे?

२. मुंबई ही भारताची कोणती राजधानी म्हणून ओळखली जाते?

३. मुंबई मध्ये कोणकोणत्या संस्था आहेत?

४. मुंबई मध्ये कोणत्या संधी उपलब्ध आहेत?

५. मुंबई हे कोणत्या उद्योगाचे केंद्र आहे?

**प्र.१९] खालील दिलेल्या मुद्द्यावरून गोष्ट लिहा. गोष्टीला योग्य शीर्षक द्या.** **[1x5=5]**

[मुद्दे : एक सिंह - दमला होता. - झाडाखाली झोपला. - उंदीर खेळत - अंगावर - उडया मारू - झोपमोड झाली. - राग आला - दुर्लक्ष केले - त्रास देऊ लागला, उंदराला पकडले - उंदीर घाबरला - महाराज मला माफ करा - मदत करीन - सिंह हसू - काय मदत करणार - शिकारी - जाळे लावले - बाहेर पडला - डरकाळी ऐकली - जाळे कुरतडले - आभार मानले.]